सप्टेंबर २०२५ या कालावधीत झालेल्या नुकसानीबाबत बाधित शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**मदत व पुनर्वसन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक- सीएलएस २०२६/प्र.क्र. ७६ (भाग-२२) /मदत-१(म-३ )**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २१ सप्टेंबर, २०२६

**वाचा :-**

१) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्र. संकीर्ण.क्र.६७/म-११,दि.२४.०१.२०२३.
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३,दि.२७.०३.२०२३
३) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस- २०२५ /प्र.क्र. २०/म-३,दि.३०.०५.२०२५
४) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस- २०२५ /प्र.क्र. ३६५/म-३,दि.१०.१०.२०२५
५) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस- २०२५ /प्र.क्र. ७६(भाग-१३)/म-३,दि.१८.१०.२०२५
६) शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस- २०२५ /प्र.क्र. ७६(भाग-१५/म-३,दि.२०.१०.२०२५
७) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र. मशा/टंचाई/शेतीपीक नुकसान/ज-३/१२०२०/२१० /२०२५, दि. २४.१२.२०२५
८) मा. मंत्री, मदत व पुनर्वसन यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०२.०७.२०२६ रोजीच्या मा. मंत्रीमंडळ उपसमितीच्या बैठकीचे इतिवृत्त

**प्रस्तावना:-**

अतिवृष्टी, पूर व चक्रीवादळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास पुढील हंगामामध्ये उपयोगी पडावे याकरिता शेतकऱ्यांना निविष्ठा अनुदान (Input subsidy) स्वरूपात एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून विहित दराने मदत देण्यात येते. तसेच, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या इतर मान्य बाबींकरिता देखील विहित दराने मदत देण्यात येते. शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र.सीएलएस-२०२२/प्र.क्र.३४९/म-३, दि.२७.०३.२०२३ अन्वये राज्य आपत्ती प्रतिसाद निधीचे निकष व दर विहित करण्यात आले आहेत. केंद्र शासनाने विहित केलेल्या १२ नैसर्गिक आपत्तींव्यतिरिक्त राज्य शासनाने दि.३०.०१.२०१४ अन्वये अवेळी पाऊस, अतिवृष्टी, वीज कोसळणे, समुद्राचे उधाण व आकस्मिक आग या स्थानिक आपत्तींमध्ये बाधितांना मदत देण्याचे धोरण निश्चित केले आहे. तसेच, दि.२२.६.२०२३ च्या शासन निर्णयान्वये सततचा पाऊस ही नैसर्गिक आपत्ती घोषित करण्यात आली आहे.

२. खरीप २०२५ व या पुढील कालावधीकरीता केंद्र / राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या नैसर्गिक आपत्तींमुळे झालेल्या शेती पिक नुकसानीबाबत द्यावयाचे निविष्ठा अनुदानाचे दर व निकष शासन निर्णय दिनांक २७.०३.२०२३ प्रमाणे देय राहील, असा निर्णय दिनांक ३०.०५.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे. तसेच, संदर्भ क्र. ४ येथील, दिनांक १०.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये २-३ हेक्टर मर्यादेतील (वाढीव १ हेक्टर) देखील मदत जाहीर करण्यात आली आहे.

३.	त्यानुसार दिनांक २७.०३.२०२३ व दिनांक १०.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयातील निकष व दर यानुसार विभागीय आयुक्त, नाशिक यांनी दिनांक १७.१०.२०२५ अन्वये कापूस हे पीक संपूर्ण जिरायत म्हणून, दर्शवून सादर केलेल्या शेती पिक नुकसानीबाबत संदर्भ क्र. ५ व ६ येथील दिनांक १८.१०.२०२५ व दिनांक २०.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णायान्वये निधी मंजूर करण्यात आला आहे. आता, विभागीय आयुक्त, नाशिक यांनी संदर्भ क्र. ७ येथील दि. २४.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये, माहे सप्टेंबर २०२५ या कालावधीतील जळगांव जिल्ह्यातील पाचोरा व भडगांव तालुक्यातील कापूस या पिकाची नुकसान भरपाईच्या रकमेची सुधारित जिरायत व बागायत प्रमाणे परिगणना करून सुधारित बागायत (०-२ हेक्टर) आणि (वाढीव २-३ हेक्टर) क्षेत्रासाठी उर्वरित नुकसानीबाबत अनुदान मिळण्याबाबतचा प्रस्ताव सादर केला आहे.

४.	सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने, दिनांक २७.०३.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील तरतुदींनुसार जळगांव जिल्ह्याचा कापूस पिक नुकसान प्रस्ताव निकषात बसत आहे. परंतु यापूर्वीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, जळगांव व विभागीय आयुक्त, नाशिक यांनी कापूस हे पिक संपूर्ण जिरायत क्षेत्र दर्शविल्यानुसार , नुकसान भरपाई दिली आहे. तथापि, प्रत्यक्षात कापूस या पिकाचे जिरायत व बागायत क्षेत्र याप्रमाणे झालेले नुकसान विचारात घेऊन, वाढीव निधीच्या विभागीय आयुक्त, नाशिक यांनी केलेल्या मागणीप्रमाणे बागायत क्षेत्रासाठी (०-२ हेक्टर) आणि (२-३ हेक्टर) **रू.४५४८.७६ लक्ष** इतक्या रकमेच्या प्रस्तावास, मा.मंत्री (मदत व पुनर्वसन), यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या दिनांक ०२.०७.२०२६ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यानुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेला आहे.

**शासन निर्णय :-**

विभागीय आयुक्त, नाशिक यांनी जळगांव जिल्ह्यामधील पाचोरा व भडगांव तालुक्यातील, माहे सप्टेंबर-२०२५ मधील, कापूस या पिकाची नुकसान भरपाईच्या रकमेची सुधारित जिरायत व बागायत प्रमाणे परिगणना करून सुधारित बागायत (०-२ हेक्टर) आणि (वाढीव २-३ हेक्टर) क्षेत्रासाठी उर्वरित नुकसानीबाबत रू.४५४८.७६ लक्ष इतकी मदत देण्याबाबत, संदर्भाधीन क्र.२ ते ४ येथील शासन निर्णयान्वये निश्चित केलेल्या दरानुसार रूपये ४५,४८,७६,०००/- (रूपये पंचेचाळीस कोटी अठेचाळीस लक्ष शहाहत्तर हजार फक्त) इतका निधी मा. मंत्रीमंडळ उपसमितीच्या दिनांक ०२.०७.२०२६ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार, वितरीत करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

२.	या शासन निर्णयासोबत जोडलेल्या प्रपत्रात दर्शविल्याप्रमाणे उपलब्ध तरतुदीमधून अथवा आवश्यकतेनुसार पुर्नविनियोजनाव्दारे तरतुद उपलब्ध करुन घेऊन कार्यासन मदत-३ (म-११) यांनी हा निधी वितरित करावा.

३.   संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथे नमूद दि.२४.०१.२०२३ अन्वये सूचित केल्यानुसार DBT पोर्टलव्दारे लाभार्थ्यांना थेट त्यांच्या बँक खात्यात निधी वितरीत करण्यात यावा. सोबतच्या प्रपत्रामधील सर्व लाभार्थ्यांची माहिती विहित नमुन्यात काळजीपूर्वक तयार करुन संबंधित अधिकाऱ्यांनी ती संगणकीय प्रणालीवर भरुन मान्यतेबाबत नियमानुसार कार्यवाही करावी. तथापि,

अ)   चालू हंगामामध्ये यापूर्वी शेतीपिकांच्या नुकसानीकरिता वितरीत करण्यात आलेल्या मदतीच्या निधीमध्ये या प्रस्तांवातर्गत मागणी करण्यात आलेल्या निधीचा समावेश नाही याची दक्षता घ्यावी. एका हंगामात एक वेळेस याप्रमाणे विहित दराने मदत देण्यात येत असल्याची खात्री करावी.

ब)   कोणत्याही लाभार्थ्यांना मदत देतांना व्दिरुक्ती होणार नाही याची तहसिलदार यांनी व जिल्हाधिकारी कार्यालयाने कटाक्षाने काळजी घ्यावी.

४.   हा निधी खर्च करताना संदर्भाधीन सर्व शासन निर्णयातील सुचनांचे व निकषांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. ज्या प्रयोजनासाठी निधी मंजूर करण्यात आला आहे त्याच प्रयोजनासाठी सदर निधी खर्च करण्यात यावा. ही मदत देताना नैसर्गिक आपत्तीकरिता विहित केलेल्या अटी व शर्तीची पूर्तता होत असल्याची खात्री सर्व संबंधितांनी करावी.

५.   लाभार्थ्यांना मदत वाटपाची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर लाभार्थ्यांची यादी व मदतीचा तपशील जिल्ह्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावा. या आदेशाव्दारे तसेच यापूर्वी वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशाव्दारे नैसर्गिक आपत्तीमध्ये शेतकऱ्यांना दिलेला मदतीचा निधी बँकांनी कर्ज खात्यात अथवा अन्यथा वसुलीसाठी वळती करु नये याकरिता जिल्हाधिकारी यांनी सर्व बँकांना आवश्यक त्या सूचना निर्गमित कराव्यात. या सर्व सूचनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी यांची राहील.

६.   सदर निधीतून करण्यात येत असलेल्या खर्चाचे लेखे निधी आहरित करण्यात येणाऱ्या कार्यालयाच्या स्तरावर ठेवण्यात यावे व करण्यात आलेल्या खर्चाचा कोषागार कार्यालये व महालेखापाल कार्यालयाशी त्रैमासिक ताळमेळ घेण्यात यावा व उपलब्ध करून दिलेला उपरोक्त निधी खर्ची पडल्यानंतर तातडीने निधीची उपयोगिता प्रमाणपत्रे संबंधितांकडून प्राप्त करून घेवून एकत्रितरित्या शासनास सादर करण्याची जबाबदारी विभागीय आयुक्त यांची राहील.

७.   अ) सदर शेतीपिक नुकसानीचा (०-२) हेक्टर मर्यादेतील खर्च - मागणी क्र.सी-६; मुख्य लेखाशिर्ष २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर, चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य; (९१) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च; (९१) (०५) नैसर्गिक आपत्तीमुळे पिकनुकसानीकरिता शेतकऱ्यांना सहाय्य (अनिवार्य); ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (सशर्त) (२२४५ २४५२) या लेखाशीर्षाखाली सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे आर्थिक वर्ष २०२६-२७ मधून भागविण्यात यावा.

ब) दि. १०.१०.२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या निकषाबाहेर देण्यात येणाऱ्या मदतीच्या अनुषंगाने, २-३ हेक्टर मर्यादेतील (वाढीव १ हेक्टर शेतीपिक नुकसानीचा खर्च) - मागणी क्र.सी-६; मुख्य लेखाशिर्ष २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी अर्थसहाय, ०२ पुर, चक्रीवादळे इत्यादी, १०१, अनुग्रह सहाय्य; (९२) राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानका व्यतिरिक्त खर्च; (९२) (१२) नैसर्गिक आपत्तीमुळे पिकनुकसानीकरिता शेतकऱ्यांना सहाय्य (अनिवार्य); ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) (२२४५ २३०९) या लेखाशीर्षाखाली सोबतच्या विवरणपत्राप्रमाणे आर्थिक वर्ष २०२६-२७ मधून भागविण्यात यावा.

८. याबाबतची देयक अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई यांना सादर करण्याकरीता शासन निर्णय क्र. ओएफएम-१०/०७/प्र.क्र.२०२/ई, दिनांक १६.१०.२००७ अन्वये लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग यांना आहरण व संवितरण अधिकारी आणि वित्तीय सल्लागार व सह सचिव यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०२६०९२११४३९०१७०४१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून टाकण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने,

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.09.21 14:40:09 +05'30'

( सुनिल स. सामंत )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई,
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास, गृह निर्माण, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) ) यांचे प्रधान सचिव,मंत्रालय,मुंबई
३. मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्याक विकास व औकाफ विभाग) यांचे सचिव,मंत्रालय,मुंबई
४. मा. मंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा. मंत्री (सर्व ) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री (मदत, पुनर्वसन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
८. विधानमंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य,
९. अपर मुख्य सचिव ( वित्त ), मंत्रालय,मुंबई,
१०. सचिव (कृषि), मंत्रालय, मुंबई
११. विभागीय आयुक्त, नाशिक.
१२. आयुक्त (कृषी), कृषी आयुक्तालय, पुणे
१३. वित्तिय सल्लागार व सहसचिव,मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
१४. संचालक, लेखा व कोषागारे ,मुंबई
१५. जिल्हाधिकारी, जळगांव
१६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) १/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
१७. महालेखापाल (लेखा परिक्षा) १/२,महाराष्ट्र,मुंबई/नागपूर,
१८. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगांव

१९. कार्यासन अधिकारी (मदत-३ (म-११) मदत व पुनर्वसन प्रभाग,मंत्रालय,मुंबई
२०. वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/अर्थ-६),मंत्रालय,मुंबई
२१. निवड नस्ती (कार्यासन/ मदत-१/ म-३ )

| शासन निर्णय क्रमांक- सीएलएस २०२६/प्र.क्र. ७६ (भाग-२२ )/मदत-१ (म-३) , दि. २१ /०९/२०२६ सोबतचे विवरणपत्र | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | बागायत (अतिरिक्त निधी) | | | | | | |
| | जिल्हा | तालुका | ०-२ हे.आर (२२४५ २४५२) (उर्वरित रू. ८५००/- प्रति हेकटर प्रमाणे) | | २-३ हे.आर (२२४५ २३०९) (उर्वरित रू. ८५००/- प्रति हेकटर प्रमाणे) | | एकूण निधी (रू. लक्ष) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | बाधित क्षेत्र | निधी (रू. लक्ष) | बाधित क्षेत्र | निधी (रू. लक्ष) | (५+७) |
| १ | जळगांव | पाचोरा | ३११७६.७६ | २६५०.०२ | ८५७.६७ | ७२.९० | २७२२.९२ |
| | | भडगांव | १७१८४.३६ | १४६०.६७ | ४२९६.०९ | ३६५.१७ | १८२५.८४ |
| **एकूण** | | | **४८३६१.१२** | **४११०.६९** | **५१५३.७६** | **४३८.०७** | **४५४८.७६** |

रू. ४५,४८,७६,०००/- (रूपये पंचेचाळीस कोटी अठेचाळीस लक्ष शहाहत्तर हजार फक्त)

Digitally signed by SUNIL SAHADEV SAMANT
Date: 2026.09.21 14:40:27 +05'30'

( सुनिल स. सामंत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन